I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** अक्कलकोट उत्तर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0383 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/06/2026 16:31 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 15/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 15/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 13:34 तास **Time To (वेळेपर्यंत):** 22:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 16/06/2026 **Time (वेळ):** 16:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 16/06/2026 15:58 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे समोर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, अक्कलकोट उत्‍ तर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, अक्कलकोट उत्‍ तर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहेकॉ 567 राजशेखर रामचंद्र कोळी | | वडील चे नाव : रामचंद्र | 1. Town/Village (शहर / गाव): सत्तरफुट रोड,अशोक चौक,Tehsil (तहसील): सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): सदर बाज़ार,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | पोकॉ 619 लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे | | वडील चे नाव : दत्तात्रय देडे | 1. Town/Village (शहर / गाव): पोलीस कलनी,अक्कलकोट,Tehsil (तहसील): अक्कलकोट,Police Station (पोलीस ठाणे): अक्कलकोट उत्तर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | आकाश शरणप्पा काडरामे | | वडील चे नाव : शरणप्पा काडरामे | 1. Town/Village (शहर / गाव): आझाद गल्ली,अक्कलकोट,Tehsil (तहसील): अक्कलकोट,Police Station (पोलीस ठाणे): अक्कलकोट उत्तर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.16/06/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.15/06/2026 रोजी 10.00 वा चे सुमारास आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार समर्थ महादेव अनगले, रा. अक्कलकोट यांची ओळख करून देऊन त्यांनी त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार समर्थ अनगले यांची थोडक्यात हकिकत ऐकून घेतले. त्यानंतर आम्ही आमचेकडील अंमलदारामार्फत मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. त्यानुसार 11.30 वा चे सुमारास 1) विशाल गोपीनाथ साबळे, पद -कनिष्ठ लिपिक व 2) सुमित सुरेश जाधव, पद - कनिष्ठ लिपिक हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी आम्ही दोघा पंचांना आमची ओळख सांगुन दोन्ही पंचांची ओळख करून दिली. तक्रारदार समर्थ महादेव अनगले, रा. अक्कलकोट यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अक्कलकोट येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनगले यांना पंचासमक्ष त्यांचे नाव, पत्ता व त्यांच्या तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव समर्थ महादेव अनगले, व्यवसाय - कॅन्टीन व रसपानगृह असे सांगुन अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.366/2026 अन्वये दि.09/06/2026 भागेश चुंगीकर, सचिन भंडारी तसेच इतर 02 यांच्याविरूध्द गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस कोळी यांचेकडे आहे. सदर गुन्ह्यामध्ये

सध्या तक्रारदार अनगले यांच्याकडे असलेल्या स्कॉर्पिओ वाहनाचा वापर झाल्याचा संशय घेऊन पोलीस कोळी व देडे यांनी स्कॉर्पिओ वाहन व तक्रारदार यांच्या भाऊ बालाजी यांचा मोबाईल ताब्यात घेतले होते. तक्रारदार हे त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेले असता पोलीस कोळी व देडे यांनी तक्रारदार यांना शिवीगाळ करून गुन्ह्यातील इतर 02 मध्ये त्यांचे वडील व काकांचे नाव घालून त्यांना अटक करण्याची भिती दाखविली आणि अटक न करणे तसेच स्कॉर्पिओ वाहन आणि मोबाईल सोडण्यासाठी म्हणून 1,50,000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीवरून 1,20,000/- रू लाच मागणी करत असल्याचे तक्रार सांगितले. तक्रारदार अनगले यांना लिहीण्या वाचण्याचे कमी ज्ञान असल्याने त्यांचे तक्रारी अर्ज ला.प्र.वि कार्यालयात संगणकावर टंकलिखित करून त्याची पिं्रट काढण्यात आली. सदरचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांना वाचून दाखविला असता, तो त्यांनी बरोबर असल्याचे सांगुन त्यावर सही केली. त्यानंतर दोन्ही पंच व आम्ही त्यावर सह्रा केल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनगले यांना अक्कलकोट येथे बायपास ब्रिजजवळ जाऊन थांबण्यास सांगुन त्यांना रवाना केले.

त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हॉईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, सील, अॅन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 12.30 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण अक्कलकोटच्या दिशेने रवाना झालो. यादरम्यान तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून आम्ही सोलापूर गाणगापूर रोडवरील अक्कलकोटकडे जाणा-या बायपासच्या ब्रिजजवळ 13.10 वा. जाऊन पोहोचलो. तक्रारदार अनगले हे सुध्दा त्याठिकाणी थांबलेले होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनगले यांना शासकीय वाहनात बोलावून घेतले.

तक्रारदार अनगले यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून विशाल गोपीनाथ साबळे व पंच क्र.2 म्हणून सुमित सुरेश जाधव यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे यांना पडताळणीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनगले, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे क्ष्क् ङकक्ग्ङक्कङ क्ष्क्क्-छज्र्570क्र 5ज् च्ग्र्ज्त्र् क्ग्ङघ्. ग्ऋ्क्क क्ष्ग् क्तक्ष्ग्ऋ् 1080938 व्हॉईस रेकॉर्डर व त्तक्ष्ख्ज्क्ष्च्क्ष्ग्ग्् कंपनीचे े 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर ग्क्ष्क्ङग्र् ज्10 च्क् त्तक् क्ष् 8क्रए त्याच्या मागील बाजूस ज्एज्08च्0122झ्क्त्तच्2538008क्र असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर तक्रारदार व पंचांना पडताळणीपुर्वी त्यांचे निवेदन घ्यायचे असून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येत असल्याचे सांगुन त्याकामी आणखीन एक त्तक्ष्ख्ज्क्ष्च्क्ष्ग्ग्् कंपनीचे 04 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर ग्क्ष्क्ङग्र् ज्10 च्क् त्तक् क्ष् 4क्रए त्याच्या मागील बाजूस ऋक्ज्र्01च्ग्र्16च्झ्त्तच्2539004क्र असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केला. त्यानंतर

तक्रारदार अनगले व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 13.34 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोना/30 नरोटे यांनी केले. त्यानंतर तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 13.44 वा चे सुमारास रवाना केले.

तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे हे दोघे 14.30 वा चे सुमारास बायपास ब्रिजजवळ परत आले, त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बोलावून घेऊन तक्रारदार यांच्या गळयातील व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पडताळणीकरीता गेल्यानंतर काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र.1 साबळे दोघे अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे गेलो, त्याठिकाणी पोलीस कोळी व देडे हे दिसून न आल्याने मी खाजगी इसम काडरामे यांना फोन केला आणि स्पीकरवर फोन ठेवला. त्यावेळी मी कन्नड भाषेमध्ये त्यांचेशी संभाषण केले. त्यावेळी मी काडरामे यांना पोलीस कोळी व देडे यांच्याबाबत विचारणा केले असता ते दोघे एका बुडालेल्या इसमाच्या चौकशीमध्ये व्यस्त असल्याचे सांगुन अर्धा तासात येतील असे सांगितले. त्यामुळे आम्ही थोडावेळ वाट पाहत थांबलो परंतू कोणीच न आल्याने पुन्हा मी काडरामे यांना फोन केला असता त्यांनी ए वन चौकात बोलावले व पंधरा वीस मिनिटात येतो असे सांगितले. त्यामुळे आम्ही दोघे पुन्हा ए वन चौकात गेलो. काहीवेळाने खाजगी इसम काडरामे यांनी मला फोन करून कोळी साहेब अकलूजला गेले असल्याचे सांगुन देडे साहेब डीवासएसपी ऑफिसमध्ये असल्याचे सांगितले आणि त्यांनी पंधरा मिनिटात या म्हणल्याचे सांगितले परंतू देडे पोलीस यांनी गाडीचा विषय आधी क्लिअर करून घ्या असे सांगितले असल्याने काडरामे यांनी मला आमच्या मामास बोलून ये नंतर देडे
साहेबाला पैसे देऊन बोलू असे सांगितल्याने आम्ही तिथून परत आलो असे हकिकत सांगितले. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 साबळे यांना विचारले असता त्यांनी त्यांना थोडे फार कन्नड भाषा समजत असून तक्रारदार व खाजगी इसम काडरामे यांच्यामध्ये तक्रारदार यांनी वर सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे सांगितले. पडताळणी व सापळा पथकामध्ये कन्नड भाषा बोलता येणारे दोन्ही अंमलदारांनी संभाषणाचे रेकॉर्डींग ऐकून आम्हास व दोन्ही पंचास झालेल्या संभाषणाची सविस्तर माहिती दिली.

यादरम्यान तक्रारदार अनगले यांची पोलीस कोळी आणि पोलीस देडे यांच्याशी भेट झालेली नसल्याने आम्ही तक्रारदार यांना पोलीस कोळी यांना फोन करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी पोलीस कोळी यांना फोन केला असता त्यांचा फोन व्यस्त लागला. 14.35 वा चे सुमारास पोलीस कोळी यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर कॉल केला त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेशी मराठीमध्ये संभाषण केले. यादरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्याशी त्यांच्या स्कॉर्पिओ वाहनाबाबत चौकशी करून साहेब कुठाव तुम्ही येता का? असे विचारले परंतू त्यांनी फोन बंद केला.

पोलीस कोळी हे फोनवर बोलत नसल्याने पुन्हा तक्रारदार व पंचांना पडताळणीकरीता रवाना करण्याचे ठरवून त्यांना पडताळणीकामी आवश्यक त्या सर्व सुचना देऊन आम्ही 14.49 वा रवाना केले. तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे हे दोघे 17.21 वा चे सुमारास बायपास ब्रिजजवळ परत आले, त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बोलावून घेऊन तक्रारदार यांच्या गळयातील

व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पडताळणीकरीता गेल्यानंतर काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच दोघे मोटारसायकलवरून ए वन चौकात गेलो, त्याठिकाणी गेल्यावर मी खाजगी इसम काडरामे यांना फोन केला असता त्यांनी म्हाडा कॉलनीजवळ असल्याचे सांगुन दहा मिनिटाने ग्राऊंडजवळ येण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही ग्राऊंडकडे गेलो. तिथे जाऊन थोडावेळ वाट पाहून मी पुन्हा काडरामे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी दोन मिनिटात येतो असे सांगितले परंतू बराचवेळ ते न आल्याने मी पुन्हा त्यांना फोन केला असता त्यांनी माझ्या कामाबाबत थोडेफार बोलून पोलीस स्टेशनला बोलावले. त्यामुळे मी पंचास घेऊन पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनला गेल्यानंतर मी पुन्हा दोनवेळा त्यांचेशी फोनवर संपर्क केल्यानंतर ते काहीवेळाने तिथे आले. त्यानंतर खाजगी इसम काडरामे यांनी माझ्याशी चर्चा करून थोडेसे बाजूस जाऊन देडे यांना फोन केला. देडे यांनी पोलीस कोळी हे पोलीस स्टेशनमध्येच असल्याचे सांगुन त्यांना भेटून मार्केट यार्डजवळ येण्यास सांगितले. त्यानंतर मी, पंच व काडरामे पोलीस कोळी बसतात त्याठिकाणी जाऊन पाहिलो असता कोळी पोलीस यांनी मला कन्नड भाषेमध्ये इथ का बसला रे असे विचारले. त्यानंतर पोलीस कोळी यांनी मला कॉल रेकॉर्डींग करतो का असे विचारून माझ्या मोबाईलमध्ये कॉल रेकॉर्डींग होत नसल्याची खात्री करून घेतले. त्यानंतर मी कन्नड भाषेमध्ये साहेब याच्या पुढे..माझ्या पप्पांना काय त्रास होणार नाही ना असे विचारले असता पोलीस कोळी यांनी मला कन्नड भाषेमध्ये बघ मी काय सांगतो, पप्पा आणि काका यांना सकाळी सात वाजता घेऊन ये.. अकरा वाजता कोर्टात हजर करतो, अटक करत नाही..आत घालत नाही असे सांगितले. त्यावर मी कन्नड भाषेमध्ये माझ्या भावाच्या मोबाईलबाबत विचारलो असता, पोलीस कोळी यांनी कन्नड भाषेमध्ये देतो रे सगळ असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना मदत करण्याबाबत विनंती केली असता पोलीस कोळी यांनी कन्नड भाषेमध्ये हे बघ हात जोडू नको, वेळ तुझ्यावर आलीय, भविष्यात माझ्यवर पणे येईल..मी काय असेच वर जाणार नाही.. वेळ कोणाची खराब असते कोणाची चांगली असते..सकाळी सात वाजता जर आणल तुम्ही..सातला अटक करतो कोर्टात नेतो जामीन होतय लगेच असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना कन्नड भाषेमध्ये नाही साहेब बघा जरा, काय कमी करता असे विचारलो असता, कोळी यांनी खाजगी इसम काडरामे यांचेकडे हाताचा इशारा केला त्यावेळी काडरामे यांनी मला टोकत कन्नड भाषेमध्ये यांच्याकड नाही ते अण्णाकड हाय ते असे बोलून लाच रकमेबाबत पोलीस देडे यांच्यासोबत बोलायचे असे सांगितले. त्यावर पोलीस कोळी यांनी मला कन्नड भाषेत माझ्याकडे एवढे मोठ करावे लागेल बघ असे सांगुन त्यांच्याकडे तडजोडीचा विषय काढल्यास लाच रकमेमध्ये अजून वाढ होईल असे दर्शवून पोलीस देडे यांच्याकडेच बोलणी करण्यास होकारात्मक मान हालवून अनुमती दिली. सदर चर्चेदरम्यान पोलीस कोळी यांना अटकपुर्व जामीनाबाबत विचारणा केले असता त्यांनी कन्नड भाषेमध्ये कशाला पैसे घालवताय.. बघ सरकारी वकिल अडीच तीन हजार रुपये, आरोप पार्टी दोन हजार पाच हजारमध्ये तुमचा खेळ होतोय..तुम्हाला जामीनदार द्यायचाच आहे..अटकपुर्व झाले तरी सुध्दा जामीनदार द्यायचाच आहे.. कस करायचे असे म्हणाले. त्यावर मी तुम्ही कसे म्हणताय तस आण्णा.. असे बोलून तिथून निघालो.

पोलीस स्टेशनमधून बाहेर पडून मी, पंच व खाजगी इसम काडरामे असे तिघे पोलीस देडे यांची भेट घेण्यासाठी पोलीस कॉलनीसमोरील पाण्याची टाकीजवळ गेलो. त्यानंतर आम्ही पोलीस देडे यांना

भेटल्यावर मी त्यांच्याशी माझ्या कामाबाबत चर्चा करताना पोलीस देडे यांनी कन्नड भाषेमध्ये सकाळी सकाळी यायच सात आठ वाजता..माझ्यावर विश्वास असेल तर ऐका, नाही तरी त्या रंडीच्या लेकरु कुंभारला लावा फोन..सकाळी सकाळी सात वाजता यायच..अडीच तीन वाजता घरी जायच, आत घालत काय नाही.. आमच्या जवळच बसायचे आमच्या रुममध्ये, दोन अडीचला कोर्टात हजर करतो, जामीन करून घ्यायचे जायचे घरी.. असे सांगितले. त्यावर मी कन्नड भाषेमध्ये पुढ अण्णा पप्पांना काय प्रॉब्लेम असे विचारलो असता पोलीस देडे यांनी काही प्रॉब्लेम येत नाही असे सांगितले. त्यानंतर आम्ही गाडी व मोबाईलबाबत चर्चा करताना पोलीस देडे यांनी कन्नड भाषेमध्ये हा मोबाईल घेऊन जा म्हणलो होतो..मलाच यायला जमले नाही..बालाजीच्या नावचे दोन बॉन्ड कोरे शंभर रुपयाचे, नोटरीची एक झेरॉक्स असे म्हणून कागदपत्रे आणण्यास सांगितले. त्यानंतर मी पोलीस देडे यांना कन्नड भाषेमध्ये आण्णा कायतरी थोडे कमी करा असे म्हणून तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यावर त्यांनी कन्नड भाषेमध्ये आता मग वाढ होतय बघ अस म्हणल्यावर असे म्हणाले. त्यावेळी खाजगी इसम काडरामे यांनी कन्नड भाषेत गप बस रे एवढे सहकार्य करत आहेत असे म्हणाले. त्यावर पोलीस देडे यांनी ते बोलायच नाही शंभरवेळा तो विषय असे म्हणून लाच रकमेचा विषय काढण्यास मनाई केले. त्यानंतर जामीनच्या प्रोसिजरबाबत चर्चा झाली. त्यादरम्यान खाजगी इसम काडरामे यांनी आताच पैसे विचारून घे पहिल्यांदा असे मला सांगितले. त्यावर पोलीस देडे यांनी काल आण्णांच्या समोर झालेले आहे..एक वीस झालेल आहे असे म्हणून फायनल झालेल आहे ते असे म्हणाले. त्यावर मी वरचे जरा कमी केले असते काय असे म्हणालो असता, पोलीस देडे यांनी एक चाळीस म्हणत होते, आम्ही दोघांनी मिळून बोलून केल आहे असे सांगितले. त्यावर मी आणतो घ्या असे बोललो. त्यानंतर जामीनाबाबत चर्चा करून आम्ही परत आलो असे तक्रारदार यांनी हकिकत सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्र.1 साबळे यांना तक्रारदार अनगले यांच्यासोबत गेल्यानंतर काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार व मी हे पडताळणीदरम्यान अक्कलकोट पोलीस स्टेशन येथे खाजगी इसम काडरामे व त्यानंतर पोलीस कोळी यांना भेटलो, त्यानंतर आम्ही पोलीस कॉलनी येथे जाऊन पोलीस देडे यांची भेट घेतलो असे सांगुन वरीलप्रमाणे तक्रारदार यांचे कन्नड भाषेमध्ये संभाषण झाल्याचे सांगितले. यादरम्यान पंच क्र.1 साबळे यांनी त्यांना कन्नड भाषेचे थोडे ज्ञान असल्याने व भाषा समजत असल्याने त्यांच्यामध्ये वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या गळ्यातील काढलेला व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून त्यामधील रेकॉर्डींग फॉरवर्ड-फास्ट फॉरवर्ड करत कन्नड भाषेचे ज्ञान असलेले दोन्ही अंमलदार व तक्रारदार यांच्यासमक्ष ऐकले. त्यावेळी दोन्ही पंच समक्ष उपस्थित होते. यावेळी दोन्ही अंमलदार व तक्रारदार यांनी पडताळणीवेळी तक्रारदार यांचे खाजगी इसम काडरामे, पोलीस कोळी व पोलीस देडे यांच्याशी झालेले संभाषण ऐकून ते सविस्तरपणे समजावून सांगितले.

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान पोलीस कोळी यांचे पडताळणीवेळी तक्रारदार यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता, पोलीस कोळी यांनी माझ्याकडे एवढे मोठ करावे लागेल बघ असे सांगुन त्यांच्याकडे तडजोडीचा विषय काढल्यास लाच रकमेमध्ये अजून वाढ होईल असे दर्शवून पोलीस देडे यांच्याकडेच बोलणी करण्यास होकारात्मक मान दर्शविले असल्याने त्यांची

लाचेची मागणी अधिक स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे आम्ही तक्रारदार अनगले यांना पुन्हा खाजगी इसम काडरामे यांना सोबत घेऊन पोलीस कोळी यांची भेट घ्यावी व त्यांच्याशी पोलीस देडे यांनी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत चर्चा करावी असे सांगितले आणि खाजगी इसम काडरामे यांना फोन करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी काडरामे यांना 18.05 वा फोन केला परंतू त्यावेळी त्यांचा फोन व्यस्त होता. 18.06 वा काडरामे यांनी तक्रारदार यांना कॉलबॅक केला. सदरवेळी काडरामे यांनी तक्रारदार यांना जामीनाच्या कामकाजाबाबत कोणाशीही बोलू नका असे सांगुन पैसे त्यांच्याकडे आणून देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी मी तोंड धुवून येतो दोघ जाऊन पैसे देऊन येऊ असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी किती द्यायचे असे विचारले असता काडरामे यांनी एक वीस असे सांगितले. सदरवेळी कन्नडमध्ये झालेले संभाषण दोन्ही अंमलदार व तक्रारदार यांनी सविस्तरपणे समजावून सांगितले.

त्यानंतर आम्ही पोलीस कोळी यांच्या पडताळणीकरीता पोलीस स्टेशन येथे जाऊन तिथे काडरामे यांना भेटून पुन्हा पोलीस कोळी यांची भेट घेण्यासाठी जाण्याचे सुचना दिले आणि व्हॉईसरेकॉर्डर लावून 19.16 वा. पोलीस कोळी यांच्या पडताळणीकरीता रवाना केले. साधारण 20.55 वा चे सुमारास तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे हे दोघे बायपास ब्रिजजवळ परत आले, त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बोलावून घेऊन तक्रारदार यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पडताळणीकरीता गेल्यानंतर काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच दोघे पोलीस स्टेशनला जाऊन तिथे काडरामे यांची भेट घेतलो यावेळी मी पोलीस कोळी यांची पुन्हा भेट घालून देण्याच्या संदर्भाने काडरामे यांच्याशी चर्चा केले. त्यावर काडरामे यांनी ब-याचवेळा नकार देऊन पोलीस देडे आल्यानंतर पोलीस कोळी यांना भेटायला जाण्यास तयार झाले. यादरम्यान मी व काडरामे दोघे चर्चा करताना पोलीस कोळी हे त्यांच्या कार्यालयातून बाहेर आले, त्यावेळी काडरामे यांनी त्यांना कॉफी पिण्यास बोलावले असता त्यांनी ब्लॅक टी घेऊन येण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही त्यांच्याकरीता ब्लॅक टी घेऊन त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी काडरामे यांनी पंच क्र.1 साबळे यांना पोलीस स्टेशन आवारात थांबण्यास सांगुन पोलीस कोळी यांच्या कार्यालयात येण्यापासून थांबवले. त्यावेळी पोलीस कोळी यांनी उद्या मी सांगितल्यासारख जबाबदारी माझ असे म्हणाले. त्याचवेळी पोलीस कोळी यांनी जामीन झाल नाही तर तुमच्या घरी पाणी भरतो मी असे म्हणाले. त्यानंतर सदरठिकाणी पोलीस देडे, पोलीस कोळी व माझ्यामध्ये बरीच चर्चा झाली. यादरम्यान जामीनच्या प्रोसिजरबाबत चर्चा झाल्यावर आम्ही बाहेर निघण्याच्या तयारीत असताना पोलीस देडे यांनी ए.. ते काय असेल ते बोलून घे असे सांगितले. त्यावेळी पोलीस देडे हे फोनवर असल्याने पोलीस कोळी यांनी देडे यांना टोकत तु आधी फोन बंद कर नंतर बोल त्यावर. तिकडपण इकड पण असे म्हणून प्रथम माझ्याशी चर्चा करून नंतर त्यांना फोन बघण्यास सांगितले. पोलीस कोळी यांनी पोलीस देडे यांना माझ्याशी चर्चा करण्यास सांगितले असता पोलीस देडे यांनी लागलीच मला आकाशकड दे असे म्हणून खाजगी इसम आकाश काडरामे यांच्याकडे पैसे देण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही तिथून बाहेर पडलो. त्यानंतर काडरामे यांनी मला आधारकार्ड फोटो पैसे इ. घेऊन येण्यास लवकर येण्यास सांगितले. त्यानंतर मी पंच क्र.1 साबळे यांना घेऊन पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो असे सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्र.1 साबळे यांच्याकडे विचारणा केले असता, त्यांनी खाजगी इसम काडरामे

यांनी त्यांना पोलीस कोळी यांच्या भेटीवेळी बाहेर थांबण्यास सांगितले असून ते बाहेर आल्यानंतर आधारकार्ड, फोटो व पैसे इ. बाबत बोलणी केल्याचे त्यांनी समक्ष ऐकल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या गळ्यातील काढलेला व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून त्यामधील रेकॉर्डींग फॉरवर्ड-फास्ट फॉरवर्ड करत कन्नड भाषेचे ज्ञान असलेले दोन्ही अंमलदार व तक्रारदार यांच्यासमक्ष ऐकले. त्यावेळी दोन्ही पंच समक्ष उपस्थित होते. यावेळी दोन्ही अंमलदार व तक्रारदार यांनी पडताळणीवेळी तक्रारदार यांचे खाजगी इसम काडरामे, पोलीस कोळी व पोलीस देडे यांच्याशी झालेले संभाषण ऐकून ते सविस्तरपणे समजावून सांगितले.

पडताळणीदरम्यान पोलीस कोळी, पोलीस देडे व खाजगी इसम काडरामे यांनी तक्रारदार यांच्या वडीलांचे जामीन करून देण्यासाठी व त्यांच्याकडून ताब्यात घेतलेले स्कॉर्पिओ व मोबाईल परत देण्यासाठी 1,20,000/- रू लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे त्यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरले. सदर प्रकरणी लाच रकमेचा आकडा मोठा असल्याने नोटांचे क्रमांक लिहून घेणे सोयीस्कर होण्यासाठी आम्ही तक्रारदार यांचेकडून पुर्वीच त्यांच्याकडील नोटा ताब्यात घेतल्या होत्या व तक्रारदार यांना पडताळणीकरीता रवाना केल्यानंतर आम्ही अंमलदारांच्या सहायाने नोटांचे क्रमांक कागदावर लिहून घेतले होते. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांना अॅन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून, सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यावेळी पंच क्र. 01 यांना खाजगी इसम काडरामे यांनी लाच रक्कम स्विकारले नंतर त्यांनी त्यांचे डोक्यावरून डावा हात फिरवून लाच स्विकारलेचा इशारा करणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 21.37 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोहेकॉ/30 नरोटे यांनी त्यांचे मोबाईलमधून वर नमुद मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार अनगले व पंच क्र.1 साबळे यांना 21.45 अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वतः, पंच क्र.2 जाधव, पोहेकॉ/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून अक्कलकोट पोलीस स्टेशनच्या दिशेने रवाना झालो.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार अनगले व पंच क्र.1 हे दोघे पोलीस स्टेशनच्या समोर उभे असलेले खाजगी इसम काडरामे यांची भेट घेतली. यादरम्यान नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याचे काम केलेले चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना आम्ही वाहनातच थांबवून पोलीस स्टेशनसमोर वेगवेगळ्या ठिकाणी सापळा लावून थांबलो. खाजगी इसम काडरामे यांनी तक्रारदार यांच्याशी चर्चा करत असताना त्यांच्याकडून उजव्या हाताने लाच रक्कम स्वीकारून त्यांच्या ट्रॅक पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवताना पंच क्र. 01 यांनी केलेल्या इशा-यावरून आम्ही व सापळा पथकातील अंमलदारांनी खाजगी इसम आकाश काडरामे यांना 22.00 वा. ताब्यात घेतले. त्यानंतर सदरठिकाणी आकाश काडरामे यांचे नाव व पत्ता इ. माहिती घेतली असता, त्यांनी त्यांचे नाव आकाश शरणप्पा काडरामे, रा. आझाद गल्ली, अक्कलकोट असे सांगुन ते ड्रायव्हरचे काम करत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही काडरामे यांना त्यांनी स्वीकारलेल्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे ट्रॅक पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष काढून देताना ते

त्यांच्या पायाजवळ टाकले. त्यावर आम्ही त्यांना झालेल्या कारवाईची माहिती देऊन लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी खाली पायाजवळ टाकलेले रक्कम पुन्हा घेऊन दिले. त्यानंतर आमच्या सुचनेवरून पंच क्र.2 जाधव यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर सदरची वेळ ही रात्रीची असल्याने नैसर्गिक अंधार होता. त्यावेळी काडरामे यांच्या दोन्ही तळहाताची व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यांचे उजव्या हाताचे बोटांवर व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांवर अ‍ॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर काडरामे यांच्या अंगातील ट्रॅकपॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशाची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर अ‍ॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदरठिकाणी काडरामे यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर आम्ही काडरामे यांना पोलीस कोळी व पोलीस देडे यांच्याबाबत विचारणा केले असता त्यांनी माहित नाही असे बोलून उडवाउडवीची उत्तरे दिली परंतू आम्ही त्यांना अधिक विश्वासात घेऊन विचारणा केल्यानंतर पोलीस कोळी हे सोलापूरला गेल्याचे सांगुन पोलीस देडे हे पोलीस कॉलनीमधील त्यांच्या घरी असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही काडरामे यांना वाहनात घेऊन पोलीस देडे यांच्या घराकडे निघालो. यादरम्यान आमच्या सुचनेवरून काडरामे यांनी त्यांच्या मोबाईलवरून पोलीस देडे यांना कॉल केला असता त्यांनी घरी येण्यास सांगितले परंतू आम्ही त्यांच्या घराजवळ पोहोचल्यावर काडरामे यांनी त्यांना फोन केला असता ते फोन बंद करून निघून गेल्याचे दिसून आले. पोलीस स्टेशनसमोरच सापळा कारवाई झाल्याने पोलीस देडे व पोलीस कोळी यांना त्याची माहिती मिळण्याची शक्यता होती, त्यामुळे आम्ही पुन्हा पोलीस स्टेशन येथे येऊन अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांना झालेल्या कारवाईची माहिती दिली. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनाने आणि तक्रारदार हे त्यांच्याकडील वाहनाने ला.प्र.वि सोलापूर येथे आलो. त्याठिकाणी आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाईवेळी खाजगी इसम काडरामे यांना भेटण्यासाठी गेल्यानंतर काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच दोघे पोलीस स्टेशन येथे गेलो, त्यावेळी काडरामे यांनी पोलीस कोळी व पोलीस देडे जेवायला गेले असल्याचे सांगुन पोलीस देडे यांनी लाच रक्कम त्यांच्याकडे ठेऊन घेण्यास सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर काडरामे यांनी त्यांच्या मोबाईलवरून पोलीस देडे यांना फोन करून फोन स्पीकरवर ठेवले. त्यावेळी पोलीस देडे यांनी काय झाल आकडा असे काडरामे यांना विचारले असता, काडरामे यांनी आणलय, आलाय असे सांगितले. त्यानंतर पोलीस देडे यांनी तक्रारदार यांच्या वडीलांना आणि काकांना उद्या सकाळी सात वाजता घेऊन येण्याचे निरोप देण्यास सांगुन पैसे काडरामे यांच्याकडे ठेऊन घेण्यास सांगितले. त्यानंतर फोन बंद झाल्यावर काडरामे यांनी मला आधारकार्ड व फोटोची मागणी केली. त्यावेळी मी ते व्हॉट्सअ‍ॅपरवर पाठवतो असे सांगितलो. त्यानंतर जामीनबाबत बोलणी करून काडरामे यांनी पोलीस देडे यांचा निरोप सांगितल्यानंतर मी माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशात अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून काडरामे यांच्यासमोर धरले आणि घे अण्णा असे म्हणालो असता त्यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्वीकारून त्यांच्या ट्रॅकपॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेऊ लागले आणि त्यावेळी थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या त्यांच्या मित्रास पैसे मोजण्याकरीता बोलावले. सदरवेळी ते पैसे त्यांच्याकडे देण्याच्या आधीच पंच क्र. 01 यांनी त्यांच्या

डोक्यावरून त्यांचा डावा हात फिरवून पुर्वनियोजित इशारा दिला. त्यावर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार त्याठिकाणी येऊन खाजगी इसम काडरामे यांना ताब्यात घेतले. याप्रमाणे हकिकत सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्र.1 साबळे यांना सापळा कारवाईदरम्यान खाजगी इसम काडरामे यांची भेट घेण्यासाठी गेल्यानंतर काय घडले याची हकिकत कथन करण्यास सांगितले असता त्यांनीसुध्दा वरीलप्रमाणे हकिकत सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर संगणकास लावून त्यामध्ये रेकॉर्ड झालेले फाईलमधील संभाषण चालू करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता त्यामध्ये वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.

सदर पडताळणी व सापळा कारवाईवेळी झालेले संभाषण हे कन्नड भाषेमध्ये असल्याने कन्नड भाषेचे ज्ञान असलेले अंमलदारांच्या साहायाने संभाषणाचा उतारा काढण्यात आला. त्याचप्रमाणे सदर कन्नड भाषेमध्ये झालेल्या संभाषणाचे खात्री होण्याकरीता आम्ही कन्नड शाळेमधील शिक्षकाची सेवा उपलब्ध करून घेतले आणि त्यांच्यासमोर रेकॉर्डीग झालेले संभाषण लावून काढण्यात आलेले संभाषण उता-याचे अनुवादन बरोबर असल्याची खात्री करून घेतले. त्यानंतर ला.प्र.वि कार्यालयामध्ये सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.15/06/2026 रोजी तक्रारदार समर्थ महादेव अनगले यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.15/06/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान अक्कलकोट उत्तर पो.स्टे गु.र.नं.366/2026 अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांच्याकडून ताब्यात घेतलेले स्कॉर्पिओ वाहन व मोबाईल परत देण्यासाठी तसेच सदर गुन्ह्यात तक्रारदार यांचे वडील व काकांना अटक करून लवकर जामीन करून देण्यासाठी अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनमधील पोहेकॉ/567 राजशेखर रामचंद्र कोळी, वय अंदाजे 42 वर्षे, रा. सत्तरफुट रोड, अशोक चौक, सोलापूर यांनी, पोकॉ/619 लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे, वय 33 वर्षे, व खाजगी इसम आकाश शरणप्पा काडरामे, यांनी तक्रारदार यांचेकडे केलेल्या 1,20,000/- रू. लाचेची मागणीमध्ये सहभाग घेवून लाच मागणीकरीता व लाच रक्कम स्विकृतीकरीता प्रोत्साहन देवून तसेच पोकॉ/619 लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे, वय 33 वर्षे, रा. पोलीस कॉलनी, अक्कलकोट व खाजगी इसम आकाश शरणप्पा काडरामे, वय 33 वर्षे, व्यवसाय-चालक, रा. आझाद गल्ली, अक्कलकोट यांनी तक्रारदार यांचेकडे 1,20,000/- रू. लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम खाजगी इसम आकाश शरणप्पा काडरामे यांच्यामार्फतीने स्वीकारून सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी बेकायदेशीर पारितोषण प्राप्त करून गैरवर्तन केल्याने नमुद वरील तिघांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7-अ व 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

**13.**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** DIPAK BALNATH BHITADE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DIPAK BALNATH BHITADE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DGPDBBM8202

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**

**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1984 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1993 | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | 1993 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त यापेक्षा अधिक तपशील दिल्‌ यास फक्‌ त यातील रकान्‌ यांची नोंद घेतली जाईल)**